# एकविसाव्या शतकातील जनसाहित्य

**प्रा मुनेश्वर ता. जमईवार**
*मराठी विभागप्रमुख*
*विदर्भ महाविद्यालय, बुलडाणा*

**प्रस्तावना :**

एकविसाव्या शतकाच्या दुसऱ्या दशकात सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि राजकीय क्षेत्रात मोठ्या प्रमाणात उलथापालथी होत आहेत. सांस्कृतिक संकराबरोबरच शिक्षणाच माहिती तंत्रज्ञानाचा विस्फोट झालेला आहे. सामाजिक जिवनात धावपळ, दगदगीबरोबरच अस्थिरतेचे असुरक्षिततेचं, अविस्वासाचे आणि विषमतेचे वातावरण निर्माण होत आहे. निसर्ग, पर्यावरण, मानवीजीवन यांना उध्वस्त करीत महासत्तेची घोडदौड सुरू आहे. अशा प्राप्त परिस्थितीमुळे भाषा आणि साहित्यही प्रभावी होत आहे. आज चंगळवादालाच जीवनमूल्ये समजून त्याचेच साहित्यातून चित्रण करण्याची प्रवृत्ती जोर धरू लागली आहे. जीवनमुल्यहित केवळ रंजनप्रधान आणि तत्काळ प्रभावित करणारे साहित्य जनमानसावर लादले जात आहे. त्यामुळे संस्कार, नितीमुल्ये प्रभावित होऊन जनसंस्कृती विकृतावस्थेकडे वाटचाल करताना दिसते आहे.

साहित्य हे सर्वसामान्य जनासाठी असावे, जनांची सुख-दुखे, आशा-आकांशा, गुण-दोष आणि त्याची जीवन जगण्याची सहज पध्दत अधोरेखील करणारे असावे लागते. प्रा. या. वा. वडस्कर म्हणतात "जनसाहित्याची संकल्पना अलिकडच्या काळात मांडण्यात येत असली तरी या साहित्याची परंपरा फार जुनी आहे मानवी स्वातंत्र्याची, मानसाच्या महत्तेची सूक्ते प्राचीन काळापासून सातत्याने गायेली जात आहेत, हे जनसाहित्य होय.'

अभावग्रस्त व पीडित लोकांचे चित्रण करणारे, त्यांच्या व्यथा वेदनांना साहित्य मूल्यात बांधणारे, त्यांच्या मुक्तिलढ्यांना कलारूप प्रदान करणारे साहित्य म्हणजे जनसाहित्य. जनसाहित्याची ही संकल्पना लौकिक आहे. लौकीकाची संकल्पना भौतिक असली तरी ती व्यापक आहे. जनसाहित्यात चित्रित झालेली माणसे, पूजा अर्चा, नवस यास करीत असली तरी ती अध्यात्मशरन नसतात. उलट ती जीवन सुंदर व अर्थपूर्ण होण्यासाठी सतत संघर्ष करत असतात त्यांच्या जीवनसंघर्षाची मुख्य लय माणूस असते. जनसाहित्य हे मानसातील माणुसकी जपणारे व जागविणारे साहित्य म्हणून ते जनसाहित्य आहे. या साहित्य प्रवाहात दलित, ग्रामीण, स्त्री, भटके, आदिवासी या सर्वांचे चित्रण येते.

**जनसाहित्याची परंपरा :**

जनसाहित्याला फार मोठी पंरपरा लाभली आहे. सर्वच पुरोगामी विचारांचे संत साहित्य तसेच रविंद्रनाथ टागोर, मुन्सी प्रेमचंद, महात्मा फुले, संत तुकडोजी महाराज, महात्मागांधी, अमृता प्रीतम, सावित्रीबाई फुले, कर्मयोगी गाडगे बाबा यांच्या जीवन कार्यातून व त्यांच्या साहित्यातून दिसून येते.

उत्तर भारतात संत कबीर, गुरुनानक, महाराष्ट्रात वारकरी संप्रदायात संत मंडळीने जनहितासाठीच कार्य व साहित्य लिहीले आहे. संत तुकाराम, संत एकनाथ, संत ज्ञानेश्वर, संत सावता, महात्मा बसवेश्वर, सर्वज्ञ महात्मा चक्रधर, यांच्या अभंग साहित्यातला व्यक्ती हा जनसामान्यच होता. त्यांच्याच हितासाठी त्यांनी आपले जीवनकार्य समर्पीत केले आहे. या सर्व संतांनी सर्व सामान्य व्यक्तीचे हित, त्यांच्या दुःख शोधुन व्याधी कसे कमी करता येतील या तळमळीने कार्य केले आहे. या सर्वांनी मानसाला मध्यवर्ती स्थान देऊन जात, वर्ग, रंग व प्रादेशिक मर्यादायांच्या पलिकडे जाऊन मानसावरील अपरंपार प्रेमातून साहित्य निर्माण केले आहे. म्हणून त्यांचे साहित्य हे जनसाहित्य ठरतं.

**समाज परिवर्तनवादी विचार:**

संत, महात्मे, महामानवांनी तत्कालीन परिस्थितीतील समस्या आव्हाने स्विकारुन समाज परिवर्तन घडवून आणण्याचे मोलाचे कार्य केले आहे. संत तुकारामाचे साहित्य हे सर्वांचा विचार करणारे साहित्य आहे. त्यांनी भक्ती म्हणजे जनसेवा या भावनेतून त्यांचा परमेश्वर हा विश्वविश्वंभर, जनी जनार्दन आहे. या विश्वरूप परमेश्वराची पूजा म्हणजे भक्ती, ही पूजा कर्माने करावी. भक्ती म्हणजे सेवा, जनसेवा भक्ती म्हणजे जनभक्ती सर्व जगातच परमेश्वर असल्याने सर्व जगच तीर्थक्षेत्र आहे, ही तुकोबांची तीर्थक्षेत्र संकल्पना परिवर्तनवादी जननिष्ठ आहे. विठ्ठल, विष्णू, परमेश्वर, सर्वेश्वर आपल्याहून वेगळा नाही हा त्यांचा अद्वैतभाव

*'भरला विठ्ठल तेथे दुजा नाही।*
*भरला अंतर्बाही सदोदीत ।।*
*विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म*
*भेदाभेद भ्रम अमंगळ'*

यातून जननिष्ठ धर्म सांगितला आहे. मानसामानसात काहीच भेद नाही, त्यामुळे भेदाभेदही अमंगळ आहे. सर्व जग परमेश्वर स्वरूप असल्याने आपणही परमेश्वरांशी जसे वागतो तसे इतरांशी वागले पाहिजे. हा त्यांनी सांगितलेला विश्वव्यापक मानवधर्म आहे. त्याचप्रमाणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचे साहित्यही कोणाचा भेद करत नाही.

*"या भारतात बंधुभाव तित्य बसू दे दे वरची असा दे*
*हे सर्व पथ संप्रदाय एक दिसू दे मतभेद नसु दें।*

या प्रार्थनेतून राष्ट्रसंत तुकडोजी महाराज सर्वांसाठी प्रार्थना करत आहेत. हाच जनधर्म आहे.

एकविसाव्या शतकाच्या दृष्टिकोनातून जनसाहित्यः

जनसाहित्याला फार मोठी क्रांतीकारी परंपरा लाभलेली आहे यात संत साहित्यापासून ते आजपर्यंतच्या साहित्यामध्ये सर्वसामान्य व्यक्तिच्या हिताचा उध्दाराचा विचार अधोरेखित झालेला आहे. मराठी साहित्यापासून बघीतले तर साहित्य लेखनी आपली कस बदलत आहे शोषित, पीडीत मानसाला अस्मिता आणि मूल्याधिष्ठित प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा प्रयत्न वर्तमानकालीन कथा, कादंबरी, कविता, तारक इ साहित्यातून होतांना दिसत आहे. ही एकविसाव्या शतकातील जनसाहित्यासाठी आशावादी बाब आहे. जागतिकीकरणानंतरच्या साहित्य प्रकरातून सर्वसामान्य लेखक आपले व समाजाचे दुःख, वेदना, विद्रोह मुखरित करीत आहे. एकविसाव्या शतकात आर्थिक दरी वाढत असली तरी साहित्यातून जननिष्ठ भावना, दुःख, वेदना, कळा, सर्वव्यापक होत आहेत. त्याचा विचारही जागतिक पातळीवर होतो आहे. जनसाहित्यात भांडवलशाही वृत्तीला महत्व नाही. जनसाहित्याने पंथ, धर्म, पक्ष, जात, लिंग, पद-पदवी या सर्वांना नाकरलेले आहे. जगात, देशात भांडवलशाही जागतिकीकरणाच्या कुप्रवृत्तीमुळे गरीब-श्रीमंत दरी वाढलेली असली तरी, त्याचा स्फोट झाल्यावाचून राहणार नाही. जनसाहित्य व जनभावना ही जगाला एकसंघ व समर्थ बनवणारी गरज आहे. जनसाहित्याचे प्रयोजन जनसंस्कृतीचे पोषण, धारण, संवर्धन हे आहे. ती सुप्त अवस्थेत कधी कधी असली तरी समूळ नष्ट होत नाही. जागतिक परिवर्तने जनक्रांतीनेच झालेली आहेत. आजच्या माहिती संप्रेक्षनाच्या साधनामुळे सर्वसामान्य जनाची भावना भाषा विविध साहित्य प्रवाहातून व्यक्त होवू लागली आहे व हे वाढत जाणार आहे अशी आशा आहे.

समारोप

एकविसाव्या शतकाच्या दृष्टिने जनसाहित्याचा विचार केला असता. जनसाहित्याची संकल्पना संत साहित्यापासून आलेली आहे व तिला मोठी क्रांतीकारी परंपरा लाभलेली आहे. जनसाहित्याची भूमिका विश्वभावी मानवकेंद्री आहे ती सर्वांना सामावून घेणारी आहे. भेदाभेदरहीत एकजिनसी समताधिष्ठीत मानवसमाज निर्माण करणे हे जनसाहित्याचे ध्येय आहे. जनसाहित्याने समाज, विज्ञान संस्कृती, मानुसकी यांना महत्वाचे स्थान देऊन समताधिष्ठित समाज निर्माण करण्याचा सतत प्रयत्न केला आहे आणि तीचा एकविसाव्या शतकातील समाजरचनेसाठी गरज आहे माहिती तंत्रज्ञानाच्या साधनांमुळे गाव, प्रदेश देश ते विश्वपातळीवर बघीतले तर विविध साहित्य प्रकारातून जननिष्ठभावना व्यक्त होतांना दिसत आहे. व ही भावना सर्वांगाने साहित्यातून वाढली पाहिजे हीच एकविसाव्या शतकाची खऱ्या साहित्याच्या दृष्टिने गरज आहे.

***संदर्भग्रंथ :***

*१. डॉ. या. वा. वडस्कर, साहित्याच्या दिशेने, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९८८ पृष्ट १५*
*२. डॉ. सुभाष सावरकर, (संपादकीय), अक्षरवैदर्भी, जुलै १९८९*
*३. द. भि. कुलकर्णी, जन साहित्याची चळवळ: मुलाखती, अक्षरवैदर्भी, मार्च १९९६.*